# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – २७ फेब्रुवारी २०१५

## मराठी भाषेकडे वैश्विक दृष्टीकोनातून पाहणे काळाची गरज - पद्मश्री डॉ.गणेश देवी

## इंग्रजीचा द्वेष करुन मराठी भाषा जगणार नाही - पद्मश्री डॉ.गणेश देवी

मुंबई- मराठी ही वैश्विक भाषा असुन ही समृध्द भाषा टिकवायची असेल तर जगातील इतर भाषेतील जे- जे संचित आहे ते मराठी भाषेत आणण्यासाठी सर्वांने प्रयत्न करावे लागतील त्याचप्रमाणे या भाषेकडे वैश्विक दृष्टिकोन ठेवल्यास ही भाषा अधिक समृध्द होईल असा आशावाद आंतरराष्ट्रीय दर्जाचे भाषातज्ज्ञ पद्मश्री डॉ.गणेश देवी यांनी आज व्यक्त केला.कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंतीप्रित्यर्थ मुंबई विद्यापीठात मराठी भाषा दिवस साजरा करण्यात आला.या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.गणेश देवी बोलत होते.

"अन्य भारतीय भाषांच्या संदर्भात मराठी भाषेचे स्थान" या विषयांवर ते बोलत होते.पुढे बोलतांना ते म्हणाले की, जगात सुमारे ७० हजार वर्षापूर्वी भाषांची निर्मिती झाली.आजमितीला जगात ६ हजार भाषा जिवंत आहेत. मात्र येत्या काही काळात सुमारे ४ हजार भाषा मृतपाय होण्याच्या मार्गावर आहेत.मात्र मराठी भाषा ही समृध्द असुन या भाषेच्या संवर्धनासाठी या भाषेला व्यवसायाची भाषा बनविण्याची गरज असुन मराठीत व्यवसाय तयार होण्याची गरज आहे.त्याचप्रमाणे मराठी ही फक्त महाराष्ट्राचीच भाषा आहे असे म्हणणे चुकीचे असुन मराठी ही जगाची भाषा असुन या भाषेला वैश्विक महत्व आहे.मराठी भाषा जगवायची असेल तर इंग्रजी भाषेचा द्वेष बाळगून होणार नाही.उलट इतर भाषेतील जे-जे संचित आहे, इतर भाषेतील जे शब्द आहेत ते या भाषेत यायला पाहिजे.मराठी भाषेतील संचित नवमाध्यमात यायला पाहिजे असेही त्यांनी सांगितले.तसेच इतर भाषासंबंधी मराठी भाषेशी ओपन रिलेशनशीप ठेऊन सहभागीता वाढविणेही गरजेचे असून मराठीत व्यवसाय तयार व्हायला पाहिजे.

जगात ११० कोटी लोकं चीनी भाषा बोलत असून ८० कोटी लोकं हे इंग्रजी भाषा बोलत आहेत,मात्र मराठी भाषा ही दैनंदिन समृध्द होणारी आहे.येत्या काही काळात मराठी,तेलगू आणि भोजपूरी भाषेला अधिक महत्व प्राप्त होणार आहे.मराठी भाषेच्या संवर्धनासाठी या भाषेची पाळं-मुळांकडे लक्षं द्यावं लागेल, यांचे जतन करावे लागेल.मराठी भाषेतील समृध्द संचित समोर आणून त्यांचे जतन करुन त्यांचे सवर्धन करावे लागेल.तसेच मराठी भाषादिनी कृतिनिश्चय करुन आदिवासी भागातील भाषांचे शब्दकोश तयार करता येऊ शकणार का हे सुध्दा पाहणे गरजेचे ठरेल असे त्यांनी उपस्थितांना सांगितले.

मुंबई विद्यापीठाच्या मराठी भाषा विभागाने आयोजित केलेल्या मराठी भाषा दिन कार्यक्रमामध्ये मायमराठीचा उत्सवही 'झपूर्झा' म्हणून साजरा करण्यात आला.यामध्ये काव्यचित्र प्रदर्शन,संत कवी ते आधूनिक कविपर्यंतचा चित्रात्मक प्रवास डॉ.सुनिल अवचार यांनी मांडला.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)